## पाणीप्रश्नावर सिडकोला दणका!

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली धडक मोर्चा

बेलापूर : रामप्रहर वृत्त

सिडकोच्या बेजबाबदारपणामुळे खारघरच्या स्पॅगेटी वसाहतीत गेले काही महिने अनियमित पाणीपुरवठा होत आहे. त्या विरोधात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली रहिवाशांनी शुक्रवारी (दि. २०) सिडकोवर धडक मोर्चा काढला. या वेळी सिडको अधिकाऱ्यांना फैलावर घेताच हादरलेल्या प्रशासनाने ४८ तासांत स्पॅगेटी वसाहतीचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची हमी दिली.

सिडकोने उभारलेल्या खारघर स्पॅगेटी वसाहतीत गेली अनेक महिने अनियमित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे रहिवाशांचे पिण्याच्या पाण्याचे प्रचंड हाल होत असून, रहिवाशांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. सिडकोचा पाणीपुरवठा बंद असल्यास रहिवाशांच्या त्रासात भर पडते.

सिडको अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्ष व बेजबाबदार कारभारामुळे रहिवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब रहिवाशांनी काँग्रेसचे स्थानिक नेते सुनील सावर्डेकर यांच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांना सांगितली. स्पॅगेटी वसाहतीमधील रहिवाशांना भेडसावत असलेली समस्या विचारात घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्रस्त असलेल्या या रहिवाशांना न्याय मिळवून देण्यासाठी सिडकोला धडक दिली. या वेळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, उमेश पाटील, युवा नेते सुनील सावर्डेकर, कीर्ती नवघरे, रूपाली जैन, अ‍ॅड. जी. पी. खारगे, अक्षय लोखंडे, धुळप ठाकूर, सनी नवघरे, कुंदा मेंगडे यांच्यासह स्थानिक रहिवाशी मोठ्या संख्येने हजर होते.

यामुळे हादरलेल्या सिडको प्रशासनाने मोर्चासमोर अक्षरश: गुडघे टेकले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्याशी चर्चा करुन सिडकोचे पाणीपुरवठा खात्याचे मुख्य अभियंता एस. एन. पाटील, सहाय्यक अभियंता पोतदार यांनी युध्दपातळीवर दुरूस्ती व देखभालीचे काम पूर्ण करून ४८ तासात वसाहतीला पाणीपुरवठा सुरळीतपणे देण्याचे मान्य केले.